


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३७, गुरुवार ८ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## कांदा भाव प्रश्नावर खा.विखेंची अमित शाह यांच्याशी भेट

### ■ निर्यातबंदी उठवा किंवा नाफेड मार्फत कांदा खरेदी करा ■ खा. डॉ. सुजय विखे पाटील यांची मागणी

नवी दिल्ली: प्रतिनिधी

**खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन कांदा निर्यात बंदी उठवण्यासंदर्भात आणि शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी गृहमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा केली आहे. कांदा प्रश्नावर अमित शाह यांना राज्यातील शेतकऱ्यांसमोर येत असलेल्या अडचणी, कांदा खरेदी आणि योग्य भाव आदी विषयाची माहिती खा.विखे पाटील यांनी करून दिली असून शाह यांनीही याबाबत लवकरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय केंद्र सरकार घेईल असे आश्वासन दिले असल्याचे सांगण्यात आले आहे.**



दरम्यान याबाबत खासदार सुजय विखे पाटील यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, सध्या कांद्याचे भाव गडगडले असून शेतकऱ्यांच्या दृष्टीने आणि त्यांना कांदा पिकविण्यासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाचा जर विचार केला तर सध्या कांद्याला बाजारपेठेत मिळणारा भाव हा कमी आहे. नगर, नाशिक,पुणे या कांदा पट्ट्यात कांदा पीक घेणारा शेतकरी वर्ग मोठा असून निर्यात बंदीचा मोठा आर्थिक फटका बसत असल्याची वस्तुस्थिती खा.विखेंनी शाह यांच्या समोर मांडली आणि हा मुद्दा गृहमंत्री अमित शाह यांच्या लक्षात आणून दिला.

निर्यातबंदीचा परिणाम म्हणून कांदा खरेदी केंद्रावर येणाऱ्या कांद्याला पाहिजे तसा भाव मिळत नाही. कांद्याला एकरी येणारा खर्चही निघत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. यावर शेतकरी वर्गातून केंद्र सरकार कडून मार्ग निघण्याची आशा आहे. कांद्याच्या प्रती क्विंटल मागे असलेले दर हे वाढले पाहिजे. या अनुषंगाने केंद्र सरकारकडून सकारात्मक विचार व्हावा आणि या दृष्टिकोनातून निर्यातबंदी उठवणे किंवा नाफेड मार्फत कांदा खरेदी करण्याच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा अशी विनंती केंद्रीय मंत्र्यांना खा.विखे पाटील यांनी शाह यांची भेट घेऊन केली आहे.

यावेळी खा.सुजय विखेंना आश्वस्त करताना अमित शाह यांनी केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या नेहमीच पाठीशी असून अनेक शेतकरी हिताच्या योजना हाती घेतलेल्या आहेत. सरकार शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. या दृष्टिकोनातून लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे असे आश्वासन गृहमंत्र्यांनी दिले असल्याची माहिती खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

## पिंपरी चिंचवडच्या कुटूंबाला आ. लंकेंच्या माध्यमातून मदत

### कोल्हापूरातही मदतीचा हात

पारनेर : प्रतिनिधी

**सोलापूर जिल्हयातील टेंभुर्णी येथे अपघातात जखमी झालेल्या कुटूंबातील सदस्यांना आमदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून दोन लाख रूपयांची मदत मिळवून देण्यात आली. दरम्यान, कोल्हापूर जिल्हयातही विविध रूग्णांना दोन महिन्यात १४ लाख रूपयांची मदत मिळवून देण्यात आल्याचे राकेश पाटील यांनी सांगितले.**



टेंभुर्णी येथील अपघातानंतर पिंपरी चिंचवडच्या जखमी कुटूंबाला सोलापूर येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. संपूर्ण कुटूंब उर्वरीत पान ३ वर

### मोफत शस्त्रक्रिया

गगनबावडा तालुक्यातील निवडे येथील १० दिवसाच्या बाळावर कोल्हापूर येथे शस्त्रक्रियेसाठी लाखो रूपये खर्च सांगण्यात आला होता. त्याबाबत आ. नीलेश लंके यांना माहीती देण्यात आल्यानंतर आ. लंके यांच्या शिफारसीवरून मुंबईतील कोकीळाबेन अंबानी रूग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.

**राकेश पाटील**
साईनाथ फाउंडेशन सेवाभावी संस्था कोल्हापुर

## घोडनदीपात्रात सापडलेल्या मृतदेहाचे गूढ उलगडले

### ■ खून करणाऱ्या तीन आरोपींना अटक ■ मृत व्यक्ती बीड जिल्ह्यातील शिरूर कासारचा

शिरुर : प्रतिनिधी

**शिरुर शहरालगत घोड नदीपात्रात रस्सीने बांधलेल्या अज्ञात तरूणाच्या खूनाचा उलगडा करुन आरोपींना अटक करण्यात शिरूर व स्थानिक गुन्हे शाखेचा पोलीसांना यश आले आहे . कृष्णा गोकुळ विघ्ने वय ३२ वर्ष, रा. आनंदगाव, ता. शिरूर कासार, जि.बीड असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी तीन आरोपींना अटक केली आहे.**



याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार शिरूर येथील पाचर्णे मळा येथील घोडनदीपात्रात रामभाऊ पाचर्णे यांच्या शेताजवळ ३० ते ३५ वर्षाच्या अनोळखी पुरुष यास मारहाण करून काळया, लाल व पांढरे रंगाचे दोरीने हातपासुन पायापर्यंत ठिकठिकाणी बांधून घोडनदीत टाकण्यात आले होते . मृतदेह बरेच दिवस पाण्यात राहिल्याने मयताचा चेहरा व पूर्ण शरीर विद्रूप झालेले होते. प्रेताची ओळख पटविणेकामी प्रेताचे अंगावर केवळ कपडे, खिशात मोटर सायकलची चावी तसेच त्याचे डावे हाताचे अंगठयाजवळ असे गोंदलेले होते. यावरून मयताची ओळख पटविणे अत्यंत आव्हानात्मक असताना केवळ याच पुराव्यांच्या जोरावर राज्यभर मिसींग व्यक्ती चेक करून, वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून, बातमीदारांचा वापर करून अनोळखी मयत इसमाची ओळख पटवली पोलीस तपासामध्ये मयताचे नांव कृष्णा गोकुळ विघ्ने वय ३२ वर्ष, रा. आनंदगाव, ता. शिरूर कासार, जि.बीड असे निष्पन्न झालेले होते.

मयत कृष्णा विघ्ने यास दारू पिण्याचे व्यसन होते त्यामुळे तो दारूच्या नशेमध्ये त्याचे नातेवाईकांना शिवीगाळ मारहाण करीत होता तसेच यातील आरोपी व त्यांचा जमिनीच्या विक्रीचा पैशाचे वाटपाचे कारणावरून वाद होता त्या कारणावरून यातील आरोपी यांनी कृष्णा यास व्यसनमुक्ती केंद्रात नेतो असा बहाणा करून कृष्णाला बांबुचे दांडक्याने मारहाण करून त्यास दंडापासुन ते पायापर्यंत दोरीने बांधून त्यास आनंदगाव, ता. शिरूर कासार, जि.बीड येथून आरोपी याला गाडीमध्ये घातले व पुणे नगर रस्त्यावरील शिरूर जवळील सतरा कमान पुलावरून घोडनदी पात्रामध्ये जिवंत टाकून त्याचा खून केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

मयताची ओळख पटल्यानंतर आरोपीच्या शोध घेण्याकरीता पोलीसांनी छत्रपती संभाजीनगर , बीड, अहमदनगर या ठिकाणी वेगवेगळ्या टीम रवाना करून जागोजागी गुन्हयात सहभागी असणारे आरोपी १) अजिनाथ गोकुळ विघ्ने वय २६ वर्ष, रा . आनंदगाव, ता . शिरून कासार, जि.बीड २) गणेश प्रभाकर नागरगोजे वय २९ वर्ष, रा पीरसाहेब चौक ,निंबळक ,ता.जि .अहमदनगर ३), पाडुरंग अर्जुन विघ्ने वय ५० वर्ष, रा. आनंदगाव, उर्वरीत पान ३ वर










## मनोज जरांगेंचा चार जिल्ह्यांचा दौरा

### १० फेब्रुवारीच्या उपोषणावर ठाम

जालना :प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासाठी काढलेल्या अधिसूचनेची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी मनोज जरांगे हे अंतरवाली सरटीत १० फेब्रुवारीपासून आमरण उपोषण करणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. उपोषणापूर्वी ते आळंदी(पुणे),मुंबई, नाशिक ,बीड या जिल्ह्यांचा दौरा करणार आहेत.**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी जालन्यातील अंतरवाली सराटीत यापूर्वी दोनदा आमरण उपोषण करुन सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या होत्या. आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी अंतरवाली सराटी ते मुंबई असा मोर्चा देखील काढला. राज्य सरकारनं काढलेल्या अधिसूचनेनंतर २७ जानेवारीला मनोज जरांगे यांनी नवी मुंबईत विजयी गुलाल देखील उधळला होता.



आपल्या मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी २० जानेवारीपासून जालन्यातील अंतरवाली सराटीतून मुंबईपर्यंत पदयात्रा काढली होती. ते २६ जानेवारीला मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषण करणार होते. मात्र, नवी मुंबईत उर्वरीत पान ३ वर

## नगर अर्बन बँक घोटाळ्यातील १०५ संशयितांची कथित यादी लिक

### ■ सही, शिक्के नसल्याने संभ्रम ■ आर्थिक गुन्हे शाखा अनभिज्ञ

नगर : प्रतिनिधी

**नगर अर्बन बँकेच्या घोटाळ्यातील आरोपीआर्थिक गुन्हे शाखेला सापडत नसल्याने न्यायालयाने पोलिसांची कानउघाडणी केली. मात्र, फॉरेन्सिकऑडिटनंतर ज्या १०५ जणांवर आक्षेपअसल्याचे व ते संशयित असल्याची चर्चाआहे, त्या संशयितांची एक कथित यादी लिक झाल्याची चर्चा आहे.**

या यादीवरकोणाचेही सही व शिक्के नसल्याने हीयादी खरी की खोटी, असा संभ्रम निर्माण झाला आहे. आर्थिक गुन्हे शाखाहीयाबाबत अनभिज्ञ असल्याचे समोर आलेअसून, यादीत नावे असलेले अनेक संशयित मात्र पसार झाल्याची चर्चा बँकवर्तुळात रंगली आहे.




लिक झालेली कथितयादी व त्यासोबत एकाचा सही नसलेला कथित जबाबही आहे. यात बँकेतील गैरव्यवहार रक्कम प्रत्यक्षात ३७८ कोटी १०लाखाची असल्याचे व त्यापैकी उर्वरीत पान ३ वर



# प्रगतीमंत्र

## करा खगोलशास्त्रात करिअर



**खगोल शास्त्र जगातील सर्वात जुने व प्रभावी असे शास्त्र आहे. या शास्त्रात पृथ्वीच्या अंतरंगातील खनिज, लाव्हा यांच्यासह पृष्ठभागावरील नद्या, पर्वत सजीवसृष्टी सूर्य, चंद्र, आकाशगंगा, उल्का, ग्रहांची स्थिती त्यांचे नियम, निसर्ग, इतिहास व भविष्यातील त्यांच्या हालचाली या सर्व घटकांचा अभ्यास केला जातो...**

### खगोलशास्त्राच्या इतर शाखा...

एकेकाळी भौतिकशास्त्राची शाखा असलेले खगोलशास्त्र हे एक स्वतंत्र शास्त्र म्हणून जगाच्या समोर आले असून त्याचे विविध शाखांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यात एस्ट्रोफिजिक्स, एस्ट्ररोमेटेओरोलॉजी, एस्ट्ररोबायोलॉजी, एस्ट्ररोजियोलॉजी, एस्ट्ररोमेट्री व कास्मोलॉजी अशा विविध शाखा आहेत. या सर्व शाखा मिळून अवकाशातील रहस्यांचा अभ्यास केला जातो. प्रायोगिक तत्त्वावर त्यांना ज्योतिषाच्या ऑब्जर्वेशनल एस्ट्रोनॉमी व थिओरिटिकल एस्ट्रोफिजिक्स या रुपात विभाजित करण्यात आले आहे. ऑब्जर्वेशनल एस्ट्रोनॉमीचा संबंध टेलीस्कोप, दुर्बिण तसेच कॅमेरा यांचा उपयोग ग्रहांना पाहण्यासाठी व विविध प्रकारची उपकरणे तयार करण्यासाठी केला जातो.

### खगोलशास्त्रज्ञांची मागणी...



ज्या युवकांना अवकाशातील रहस्ये जाणून घेण्याची तसेच त्यात करियर घडवायची इच्छा आहे त्यांच्यासाठी यात भरपूर संधी आहेत. खगोलशास्त्रज्ञांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. या क्षेत्रात करियर करणाऱ्यांना भौतिकशास्त्रात रूची असणे आवश्यक आहे. खगोलशास्त्र एक व्यापक क्षेत्र आहे. या शास्त्राच्या विविध शाखा असून युवकांना त्यांच्या आवडीनुसार शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. खगोलशास्त्रात करीयर करणारे विद्यार्थी ही या क्षेत्रात राहून देशाची सेवा करू शकतात.

### व्यक्तिगत कौशल्य

खगोलशास्त्रज्ञ होण्यासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता, जिद्द व चिकाटी आवश्यक आहे. बुद्धिमत्ता, कल्पनाशीलता, समस्यांशी संघर्ष या कौशल्याने विद्यार्थी निपुण असला पाहिजे. तसेच तो विद्यार्थी गणित व संगणक शास्त्रातील किडा पाहिजे. या क्षेत्रात कमी वेळेत जास्त व अचूक काम केले जाते. त्यामुळे वेळेचे बंधन पाळणे येथे अत्यंत गरजेचे असते. अतिशय चाणाक्ष बुद्धिमत्तेसोबत विद्यार्थ्यांमध्ये मार्गदर्शकाकडून सांगितले जाणारा विषय त्वरीत आकलन करून तो विषय विविध भाषांमध्ये रूपांतरीत करून इतर ठिकाणी पाठविता आला पाहिजे.

### ग्लोबल कार्यक्षेत्र

एस्ट्रानामरचे मुख्य कार्य संशोधनावर आधारित असते. त्यामुळे त्याला सतत फिरावे लागते. त्यांचे काम हे निरिक्षण करणे व उपग्रहापासून मिळणारे सांकेतिक संदेश प्राप्त करून संबंधित वेधशाळेला ते पाठविले गेले पाहिजेत. तसेच उपग्रहाच्या कम्युनिकेशनमध्ये काही अडथळा निर्माण झाला असेल तर तो दुरुस्त करणे. पीएचडी होल्डर त्यांच्या करियरला पोस्ट डॉक्टरेट रिसर्चपासून आरंभ करतात. त्याचबरोबर विषयांच्या अभ्यासाच्या आधारावर ते ऑब्जर्वेशनल एस्ट्रोनामर, स्टेलर एस्ट्रोनामर्स व सोलर एस्ट्रोनामर्स या पदावर ही काम करू शकतात. पीएचडी करणारे युवक कॉलेज अथवा विद्यापीठात शिक्षण घेत असताना बेसीक रिसर्च डेव्हलपमेंटमध्ये करियर करू शकतात. पदवीधर विद्यार्थी एप्लाइड सिर्च व डेव्हलपमेंट या महत्त्वपूर्ण क्षेत्रात करियर घडवू शकतात. या क्षेत्रात बॅचलर डिग्री धारण करणारा विद्यार्थी टेक्नीशियन, रिसर्च असिस्टंट म्हणून करियरला सुरुवात करू शकतो. या क्षेत्रात काम करणाऱ्यांना सरकारी कार्यालये, संरक्षण मंत्रालय, अवकाश संशोधन संस्था आदी सरकारी विभागात सहज नोकरी मिळू शकते.

### पात्रता काय हवी...

खगोलशास्त्रज्ञ होण्यासाठी डॉक्टरेट डिग्री आवश्यक असते. कारण याचा संबंध संशोधन व विकास विभागाशी असतो. ज्या विद्यार्थ्याला यात प्रवेश घ्यायचा असेल तो पीसीएम विषयांच्या ग्रुपसह 12 वी उत्तीर्ण पाहिजे. थिओरिटिकल अथवा ऑब्जर्वेशनल एस्ट्रोनॉमीमध्ये करीयर करण्यासाठी बारावीत विज्ञान शाखा हवी. बारावी उत्तीर्ण केल्यानंतर गणित व भौतिकशास्त्रात पदवी घेऊ शकतात. तसेच याच विषयांमध्ये मास्टर डिग्री केल्यानंतर एस्ट्रोनॉमीमध्ये स्पेशलाइजेशनपासून तर पीएचडी करता येऊ शकते. पीएचडी केल्यानंतर अवकाश शास्त्रज्ञ, अंतराळवीर, एस्ट्रोफिजिसिस्ट किंवा अंतराळ वैज्ञानिक तसेच संशोधन अधिकारी होण्याचा मार्ग खुला होतो. रिसर्च करण्यासाठी पीएचडी अनिवार्य असून प्रविष्ट विद्यार्थ्यांना ज्वाइंट एंन्ट्रस् स्क्रीनिंग टेस्ट देणे आवश्यक आहे. इस्ट्रूमेंटेशन व एक्सपेरिमेंटल एस्ट्रोनॉमीमध्ये करियर करण्यासाठी इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल कम्युनिकेशनमध्ये बीई अथवा बीटेक केल्यानंतर या क्षेत्रासह रिसर्च क्लॉलरमध्ये प्रवेश घेता येऊ शकतो.

### शिक्षण संस्थांची नावे

- आर्यभट्ट रिसर्च इंस्टिट्युट ऑफ ऑब्जर्वेशनल, सायंसेस, मनोरा पार्क नैनिताल
- हरिश्चचंद्र रिसर्च इंस्टिट्यूट, छटांग रोड, झुसी अलाहाबाद
- इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एस्ट्रोफिजिक्स, सेकंड ब्लॉक कोरामंगला, बंगळुरू
- इंडियन इंस्टिट्यूट ऑफ जियोमेग्नेटिज्म, कळंबोली हायवे न्यू पनवेल, नवी मुंबई
- इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर एस्ट्रोनॉमी अँड एस्ट्रोफिजिक्स पोस्ट बॉक्स नं. ४ गणेशखिंड पुणे
- नॅशनल सेंटर फॉर रेडियो एस्ट्रोफिजिक्स, टाटा इंस्टिट्यूट ऑफ फण्डामेंटल रिसर्च पोस्ट बॉक्स नं. ४ गणेशखिंड पुणे
- उस्मानिया युनिव्हर्सिटी, हैदराबाद
- फिजिकल रिसर्च लॅब्रोटरी, नवरंगपूर अहमदाबाद
- स्वामी रामतीर्थ मराठवाडा युनिव्हर्सिटी, ध्यानतीर्थ गौतमीनगर विष्णुपुरी नांदेड
- इंडियन इंस्टिट्युट ऑफ सायंस बंगळुरू






**मी नेमका काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःमधील चांगले वाईट गुण समजून घेत, स्वतःमध्ये सुधारणा घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःमधील चांगले काय आणि वाईट काय हे डोळसपणे समजून घेत जाणारेच आयुष्यात यशस्वी होतात...**

### सेल्फ अवेअरनेस म्हणजे...


आपल्या आयुष्यात आपल्याला काय करायचे आहे, काय हवे आहे हे माहिती असणे. स्वतःचे चांगले गुण आणि आपल्यातली कमकुवत बाजू तुम्हाला स्वयंप्रेरणा कशामुळे मिळते आणि कशामुळे तुम्ही सुखी होता स्वतःबद्दल किंवा स्वतःच्या आयुष्यात काय बदल हवे ह्याची जाणीव असणे. आतापर्यंतच्या आयुष्यात मिळवलेले यश तुमचे इतरांबरोबरचे वर्तन कसे आहे आयुष्य संपन्न होण्यासाठी करावी लागणारी प्रगती तुमची ठाम मते आणि ध्येय तुम्ही स्वतःकडे कुठल्या नजरेने बघता, स्वतःविषयीचे मत यात अजूनही गोष्टींचा समावेश होऊ शकतो.

### सेल्फ अवेअरनेससाठी काय करावे ?

- स्वतःशी प्रामाणिक राहून आपल्या वागणुकीचा जमाखर्च पाहणे.
- आपल्या जवळच्यांना तुमच्याबद्दल योग्य फिडबॅक द्यायला सांगा आणि त्यावर न चिडता विचार करा.
- समोरच्याचे न आवडणारे गुण आपल्याला आवडत नाहीत याचे कारण म्हणजे ते गुण आपल्यातही असतात. तेव्हा लोकांशी वागताना आपल्याला काय आवडत नाही हे पाहताना स्वतःलाही तपासा.
- आपल्याला ज्याचा आदर्श वाटतो त्यांच्या जीवनाकडे पहा. त्यातले काय भावते आणि ते वेगळे काय करतात ते पहा.
- ज्याच्याबद्दल आदर आहे अशांना तुमच्यात काय बदल अपेक्षिच आहेत हे न संकोचता विचारा. या विषयावर अनेक पुस्तके उपलब्ध आहेत ती वाचण्याची सवय ठेवा.
- इंटरनेटवर अनेक प्रकारचे क्विझ, टेस्ट उपलब्ध आहेत, त्यांचा स्वतःला समजून घेण्यासाठी उपयोग करा.
- सगळ्यात जरूरीचे म्हणजे स्वतःसाठी वेळ देऊन मनाशी संवाद साधायला शिका. यामुळे आपली स्वतःशी नव्याने ओळख होऊन मैत्री होऊ शकते, जी आपल्याला आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उपयोगी ठरते. कारण आपण स्वतःकडे कसे बघतो हे इतर आपल्याकडे कसे बघतात यापेक्षा जास्त महत्त्वाचे असते.

### सेल्फ अवेअरनेसचे महत्त्व

तुम्हाला तुमच्या आयुष्यात कोणतेही बदल घडवायचे असतील तर त्यासाठी कोणतीही कृती करण्याआधी स्वतःला समजून घेणे महत्त्वाचे असते. योग्य दिशेने जाण्यासाठी काय केले पाहिजे याची जाणीव जर आपण स्वतःला ओळखत असू तरच होते. आपला मार्ग बरोबर की चूक हे आपणच ठरवू शकतो. वय वाढले तरी आयुष्यात काय मिळवायचे आहे ते माहिती नसलेले अनेक जण आपल्याला आजूबाजूला दिसत असतात. त्यांच्या आयुष्यात ध्येय नसते वा दिशा नसते. येईल तो दिवस जगायचा इतकेच ही मंडळी करताना दिसतात. अशा प्रकारच्या जगण्यामुळे फ्रस्ट्रेशन वा डिप्रेशन येण्याची शक्यता असते. मात्र सेल्फ अवेअरनेसमुळे आपल्या आवडीचे, योग्यतेचे, ध्येयपूर्ती करण्याचे करिअर करणे शक्य होते. स्वतःला समजावून घेणे म्हणजे आत्मकेंदी होणे नाही तर यातून स्वतःला ओळखून, स्वतःच्या मतांशी प्रामाणिक राहून इतरांबरोबरची नाती संपन्न करणे हे मिळवू शकतो. याचा उपयोग कॉन्फिडन्स वाढवण्यासाठी होतो. तुम्हाला लोकांशी बोलायला, त्यांच्यात मिसळायला आवडत नसेल तर लोकाभिमुख व्यवसाय निवडणे आपल्या प्रवृत्तीच्या विरुद्ध जाते आणि त्यातून आनंद, सुख मिळत नाही. आपण हिमनगासारखे असतो. बऱ्याचशा भागाशी आपली ओळखही नसते. त्यामुळे आपल्या वागण्याने कधी कधी आपणच चकित होतो. प्रत्येकाला आपण दुसऱ्यासारखे नाही याचे वाईट वाटते. मात्र आपल्यासारखे दुसरे कोणीही नाही हे मात्र विसरले जाते. स्वतःबरोबर वेळ घालवायला, मनाशी संवाद साधायला आपल्याकडे वेळ नसतो किंबहुना आपल्याला स्वतःला वेळ द्यायचा म्हणजे गिल्टी वाटत किंवा वेड्या कल्पना वाटतात. दहा मिनिटे शांत बसलो तर फोन करायचा आठवतो, गाणे ऐकावेसे वाटते. काहीवेळा आपण जर स्वतःचा विचार केला तर स्वतःला आवडणार नाही अशी सुप्त भितीही मनात असू शकते. यामुळे आपण स्वतःच्या कंपनीऐवजी इतरांची कंपनी शोधतो. स्वतःविषयी सांगा असे म्हटले की लोक आपले नाव, काय करतो, कोठे राहतो, कुटुंबात कोण हे सांगतात. पण आपण म्हणजे आपल्या नावापेक्षाही अधिक काही कामापेक्षा, व्यवसायापेक्षा अजून काही. आपल्या मित्र मैत्रिणींपेक्षा वेगळे राहतो त्या ठिकाणापेक्षा अधिक जगात वस्तूंपेक्षाही आपण अधिक असतो पण ते काय याचा प्रत्येकाने शोध घेतला पाहिजे. आपण जेव्हा कामात खूप बिझी असतो किंवा खूप एकाग्र होतो तेव्हा मेंदूचा भाग जो सेल्फ अवेअरनेसचे कार्य करतो तो टर्न ऑफ करतो. आपण एखादे काम झोकून देऊन एकाग्रतेने करतो तेव्हा स्वतःला काय वाटते हे मनातही येत नाही. त्यासाठी स्वतःला वेळ देऊन, स्वतःला केंद्रस्थानी ठेवून डोळसपणे समजावून घेणे हे सतत आणि आयुष्यभर होत राहणे गरजेचे आहे.



## नजर डिजिटल फुटप्रिंटवर!

**शिक्षणासाठी परदेशी जाण्याचा विचार करताय ? मग सोशल मीडियावरील तुमचा वावर अत्यंत काळजीपूर्वक असला पाहिजे. कारण ऑफलाइन कागदपत्रांबरोबरच सोशल मीडियावरील तुमच्या ऑनलाइन कुंडलीचा अभ्यासही परदेशी विद्यापीठं, कंपन्या करू लागल्या आहेत.**

पोस्टिंग, चॅटिंग किंवा गेमिंगच्या निमित्तानं तुम्ही सतत सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असता का? जर तुम्ही शिक्षणासाठी परदेशी जाण्याच्या विचारात असाल तर हे वाचायलाच हवं. परदेशी शिक्षणासाठी लागणारी फी, तुमची शैक्षणिक पात्रता या निकषांबरोबरच आता तुमचं डिजिटल फुटप्रिंट (सोशल मीडियावरील वावर) हेदेखील तेवढंच महत्त्वाचं ठरणार आहे. ऑफलाइन कागदपत्रांबरोबरच तुमच्या ऑनलाइन कुंडलीचा अभ्यासही परदेशी कंपनी आणि विद्यापीठं करू लागली आहेत. मिनिटामिनिटाला स्टोरी आणि स्टेटस अपडेट करण्याची सवय अनेकांना असते. पण, शिक्षण किंवा नोकरीच्या निमित्तानं परदेशी जाण्याच्या तयारीत जर तुम्ही असाल तर तुमची



ही सवय कदाचित तुम्हाला महागात पडू शकते. तुमची एखादी चुकीची पोस्टही तुम्हाला गोत्यात आणून तुमची परदेशवारी रद्द होण्यास कारणीभूत ठरू शकते. तुम्ही प्रवेशासाठी किंवा नोकरीसाठी अर्ज केल्यानंतर संबंधित कॉलेज, विद्यापीठ किंवा कंपनी तुमच्या सोशल अकाऊंटवर नजर ठेवून असते. कॅप्लन टेस्ट प्रेपच्या सर्वेक्षणानुसार तब्बल ३६ टक्के प्रवेश अधिकारी अर्जदारांचे सोशल मीडिया प्रोफाइल तपासून पाहतात. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण ११ टक्क्यांनी वाढलं असल्याचं या सर्वेक्षणात सांगण्यात आलंय. त्यामुळे, सोशल मीडियावर कोणत्या गोष्टी शेअर कराव्यात याबाबत अत्यंत सजग असणं आवश्यक असल्याचं या क्षेत्रातले तज्ज्ञ सांगताहेत.

## ऑफिस टेस्ट!



**व्यवहारात मनाला अजिबात महत्त्व नसले, तरीही मनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून चालत नाही. ऑफिसमधल्या कामकाजात विशिष्ट नैपुण्य मिळवण्यासाठी आणि प्रमोशनसाठी सतत उत्कृष्ट दर्जाचं काम करणं अपेक्षित असते. पण, मानवी मन हे यंत्र नसल्यामुळे कायम एकाच प्रकारचा प्रतिसाद शक्य नसतो. तथापि, व्यवहारात असाच प्रतिसाद गरजेचा असतो. वैयक्तिक जीवनातील ताणतणावाचा परिणाम ऑफिसमधल्या कामकाजावर होऊ न देणं महत्त्वाचं असतं. त्याचप्रमाणे ऑफिसातल्या कामाकाजाचा परिणाम वैयक्तिक जीवनावर होऊ न देणंही तितकंच गरजेचं असतं. प्रतिकूल परिस्थितीतही मानसिक संतुलन ढळू न देता कार्यरत राहणं हे वाटतं तेवढं सोपं नाही. ते केवळ अथक परिश्रमातून आणि सवयीतूनच साध्य करता येतं.**

### काही टिप्स...

- विरोध क्षणभंगुरच असावा : मतभेद असावेत; पण मनभेद असू नयेत, असे सांगितले जाते. ज्याप्रमाणे दोन वकील न्यायालयात एखाद्या विशिष्ट कायदेशीर मुद्द्यावरून परस्परविरोधी मते मांडतात; परंतु न्यायालयाच्या बाहेर आल्यावर एकमेकांचे मित्र नसले, तरी सहकारी असल्यासारखे वागतात. त्याप्रमाणे सहकाऱ्यांशी झालेला विरोध किंवा घातलेला तात्त्विक वाद हा बैठक संपल्यानंतर तेथेच सोडून द्यावा. अन्यथा विरोध आपली परिसीमा ओलांडतो आणि काही वेळा केवळ विरोधासाठी विरोध केला जातो. यामुळे सहकाऱ्यांचे भिन्न गट पडतात आणि त्यांच्यात न दिसणारी भिंत तयार होते.
- यशस्वी होण्याची गुरूकिल्ली : काही अपरिपक्व सहकारी आपला विरोध लपवू शकत नाहीत आणि एखाद्या विशिष्ट सहकाऱ्याबरोबर काम करण्याचे किंवा टाळण्याचे वरिष्ठ व्यवस्थापकाला सुचवतात. असे करण्याने व्यवस्थापकाबरोबर असलेले चांगले संबंध बिघडण्याची शक्यता असते. कशाही व्यक्तिमत्त्वाचा सहकारी बरोबर दिला असता त्याच्याबरोबर उत्कृष्ट दर्जाचे काम करण्याचे कसब असणे, यालाच यशस्वी कर्मचारी असे संबोधता येईल. समोरील व्यक्तीला सन्मान दिल्यास ती व्यक्तीही आपला सन्मान करते. तसंच, एखाद्या कर्मचाऱ्याचा अपमान केला, तर तोसुद्धा अपमान करण्याची संधी शोधत राहतो आणि वेळ येताच अपमानाची परतफेड करतो.
- अधिकार... जरा जपूनच : संस्थेने दिलेल्या अधिकाराचा उपयोग न करता वैयक्तिक लोकप्रियतेची मदत घेऊन केलेली कार्यालयीन कामे दीर्घकाळ स्मरणात राहतात. कार्यालयीन अधिकाराशिवाय इतर सहकाऱ्यांना वैयक्तिक कुशलतेचा वापर करून केलेली मदत, महत्त्वाच्या वेळी अत्यंत उपयुक्त ठरते. अशा प्रकारे मदत करत असताना इतर सहकारी आपल्या वागणुकीचा अनावश्यक गैरफायदा घेत नाहीत, याची खबरदारी घ्यावी लागते. अन्यथा, चांगल्या कामाचे सर्व श्रेय काम न करणाऱ्या अकुशल कर्मचाऱ्याला जाते. त्याचवेळी, खरोखर काम करणारा कर्मचारी स्वतःची गुणवत्ता प्रस्थापित करू शकत नाही.



- बी स्पोर्टी ॲण्ड फर्म : कार्यालयीन कारकिर्दीकडे खेळाच्या दृष्टिकोनातून पाहिले असता खेळात असणारी अनिश्चितता आणि अस्थिरता आपसूक स्वीकारली जाते. सर्व गोष्टींकडे खिलाडू वृत्तीने आणि तटस्थपणे पाहिले असता कार्यालयात होणाऱ्या गोष्टींचा अनावश्यक त्रास होत नाही. अधिकार मिळाल्यानंतर जास्त हुरळून न जाता आलेली नवीन जबाबदारी कशाप्रकारे यशस्वीपणे पेलवता येईल, याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. तसेच, अधिकार काढून घेतल्यावर तो का काढून घेतला गेला आहे, याचा विचार करणे आवश्यक असते. चांगल्या दर्जाचा विख्यात फलंदाज खेळत असताना धावा काढण्यासाठी आसक्त असतो. त्याप्रमाणेच बाद झाल्यावर क्षणाचाही विलंब न करता काही वेळा पंचांच्या निर्णयाची वाट न पाहता मैदानाबाहेरचा रस्ता धरतो. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्याने अधिकाराबाबत आसक्ती न बाळगता आसक्तीची सीमा कोठे संपते याचे भान ठेवले असता मनःस्थिती स्थिर रहाण्यास मदत होते.

## शॉर्ट न्यूज

### दोन एकर ऊस जळून खाक

**पाथर्डी :** कासार पिंपळगाव येथील हनुमान टाकळी शिवारातील नदीजवळील चावराच्या परिसरात उसाला लागलेल्या आगीत दोन एकर ऊस जळून खाक झाला. आगीची ही घटना घडली. या आगीत शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. राजेंद्र बापूसाहेब म्हस्के, अमोल आबासाहेब म्हस्के यांच्या शेतातील दोन एकर ऊस, या आगीत जळून खाक झाला. आहे. भरदुपारी दोनच्या सुमारास शेतातील वीज वाहक तार एकमेकांना चिकटल्याने उसाला आग लागली. अगोदरच शेतकरी अडचणीत असताना त्यात ही आगीची घटना घडल्याने दुष्काळात तेरावा महिना म्हणण्याची वेळ या शेतकऱ्यांवर आली आहे.

### मोटारसायकल चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

**जोहारवाडी :** शिवारातून मोटारसायकलची चोरी करणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून चोरी केलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे. शुभम गोविंद शिंदे (रा. जाफराबाद, पुणतांबा, ता. श्रीरामपुर), असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला पोलिसांनी राहुरी येथून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून आणखी काही चोरीच्या मोटारसायकल मिळतात का, याचा तपास पोलिस करीत आहेत.

### पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**खर्डा :** ग्रामपंचायत च्या वतीने भाजपचे नवनिर्वाचित भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष बाजीराव गोपाळघरे, महिला तालुका आघाडीचे अध्यक्ष खर्चाच्या सरपंच संजीवनीताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब गोपाळघरे व ग्रामपंचायत सदस्य गणेश शिंदे यांचा सत्कार सोहळा खर्डा ग्रामपंचायत मध्ये आयोजित करण्यात आला. सत्कार सोहळ्याला उत्तर देताना भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष बाजीराव गोपाळघरे म्हणाले की, मी गेली अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे काम अतिशय प्रामाणिकपणे करीत आहे.

### विठा घाटातील भगदाडाकडे दुर्लक्ष

**अकोले :** तालुक्यातील कोल्हार- घोटी रस्त्यावरील विठा घाटातील वळणावळील मोरीवर पडलेल्या भगदाडाकडे संबंधित एजन्सीबरोबरच सार्वजानिक बांधकाम विभागही दुर्लक्ष करीत आहे. दुरुस्ती करण्यासाठी दोन महिन्यांपूर्वी खोदून ठेवलेला मातीचा ढिगाराही तसाच पडून आहे. चार वर्षांपूर्वी कोल्हार-घोटी रस्त्यावरील अकोले तालुक्यातील बारी ते संगमनेर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले. यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीही मंजूर झाला. याच रस्त्यात विठा घाटातील रस्त्याचाही समावेश आहे.

### कमी-अधिक दाबाने वीजपुरवठ्यामुळे ग्राहक त्रस्त

**श्रीरामपूर :** शहरालगत असलेल्या गायकवाडवस्ती भागात गेल्या तीन-चार महिन्यांपासून अतिशय कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे. तर काही वेळा अचानक २८० ते ३०० व्होल्टचा वीज प्रवाह होत असल्याने या भागातील अनेक ग्राहकांची घरातील उपकरणे जळत आहेत. याबाबत अनेक वेळा वीज वितरण कंपनीच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही कुणी याची दखल घेत नाही. त्यामुळे या समस्येने त्रस्त झालेल्या ग्राहकांनी वीज वितरणच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला आहे.

# बेलवंडी गावात ६१८ एकर मध्ये उभारली जाणार उद्योग नगरी

## एमआयडीसी उभारणीस तत्वत: मान्यता



**मुंबई : प्रतिनिधी**

**मुंबई येथे मंगळवारी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षेखाली व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत अहमदनगर जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाची बैठक संपन्न झाली.यावेळी जिल्ह्यातील बेलवंडी ता. श्रीगोंदा येथील शेती महामंडळाच्या ६१८ एकर जमिनीवर एमआयडीसी उभारण्याला तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.**

सदर एमआयडीसीच्या आराखड्यासंदर्भात पाहणी व सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करून त्या संबंधित सर्व कामे काल मर्यादेत करण्यात यावीत असे निर्देश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी अधिकारांना दिले.एमआयडीसी सुरू करण्यासंदर्भात मोजणीचा अहवाल मागविण्यात आला आहे. पुढील प्रकियेस गती देण्यात येणार असून, तात्काळ हे काम पुर्ण करण्यात येणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. तसेच, जिल्हाधिकारी यांनी आजच उद्योग विभागाकडे विनंती प्रस्ताव सादर करावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

श्रीगोंदा तालूक्यातील बेलवंडी फार्म येथे शेती महामंडळाची मौजे पर्वतवाडी आणि महादेववाडी येथील ६१८ एकर जमीन उद्योग विभागला देण्याची तत्वत: मान्यता यावेळी देण्यात आली. या एमआयडीसी करिता खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि माजी मंत्री आमदार बबनराव पाचपुते यांनी पाठपुरावा केला होता. उद्योगनगरीसाठी जमीन दिल्याने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील आणि उद्योगमंत्री श्री. उदय सांमत यांचे आभार व्यक्त केले.

खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनी सांगितले की बेलवंडी मध्ये रस्ते वाहतूक, पाणी तसेच रेल्वे वाहतुक सुविधा उपलब्ध तर आहेच शिवाय शिर्डी, पुणे आणि नाशिक एमआयडीसी केंद्र नजीक असल्याने येणाऱ्या काळात बेलवंडी उद्योजकांना मोठी पर्वणीच ठरणार आहे.या एमआयडीसी मुळे जिल्ह्यात उद्योगाला चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, श्रीरामपूर तालुका व राहता तालुक्यातील शेती महामंडळाकडे असलेल्या जमिनीच्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. खंडकरी शेतकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनींचा भोगवटादार वर्ग / मधुन भोगवटादार वर्ग १ करणे तसेच सार्वजनिक प्रयोजनार्थ शेती महामंडळाची जमीन वाटप करणे संदर्भातील कामांचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी घेतला.

सदर बैठकीत खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी मंत्री आमदार श्री.बबनराव पाचपुते, महसूल विभागाचे अप्पर सचिव राजगोपाल देवरा, अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित माने यांच्यासह महसूल आणि शेती महामंडळ पुणे यांचे अधिकारी उपस्थित होते.

# निळवंडे उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याचा निर्णय ऐतिहासिक

## सौ. धनश्री विखे पाटील यांचे प्रतिपादन

**राहुरी : प्रतिनिधी**



**उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरणाऱ्या निळवंडे उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याचा निर्णय लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकरीता निश्चितच ऐतिहासिक आणि आनंदाचा क्षण असल्याचे निळवंडे उजव्या कालव्यामुळे शेतकरी नक्कीच सुखावेल असा विश्वास व्यक्त करून राज्यातील महायुती सरकारमुळे धरणाच्या दोन्ही कालव्याच्या कामाला गती मिळून पाणी सोडण्याच्या निर्णय शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्वपूर्ण ठरणारा असल्याचे त्यांनी सांगितले.**

उत्तर नगर जिल्ह्यासह राहुरी तालुक्यासाठी वरदान असणारे निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याचे तांभेरे, कानडगाव, निंभेरे, तुळापूर, तांदूळनेर, वडनेर, कनगर, चिंचविहरे, गुहायेथे जलपूजन रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ धनश्रीताई विखे पाटील व जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष शिवाजी राव कर्डीले यांच्या हस्ते करण्यात आले.

धनश्री विखे यांनी सांगितले की जिल्ह्याच्या विकासासाठी महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि खा.डॉ सुजय विखे पाटील सदैव प्रयत्नशील आहेत त्यांनी केलेल्या विकास कामामुळे जिल्ह्याचा विकास होत असल्याचे स्पष्ट करून,निळवंडे कालवा व्हावा ना. विखे पाटील यांचा पाठपुरवा महत्वपूर्ण ठरला असल्याचे सौ.विखे म्हणाल्या.

यावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष सुरेश बानकर, जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे,रवींद्र म्हसे, भिमराज हारदे, नानासाहेब गागरे, डॉ बापूसाहेब मुसमाडे, सरपंच निशा गागरे, उत्तम राव मुसमाडे, संदीप गीते, मारुती नालकर, सर्जेराव गाडगे, संदिप गाडगे ,आणा पाटील बलमे, बबनराव कोळसे, विजय बलमे, यांच्या सह सर्व व पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थ उपस्तीत होते.

# राज्यात धर्माच्या नावावर जातीय द्वेष पेरला जातोय

## आ.रोहित पवार यांचे प्रतिपादन

**पाथर्डी : प्रतिनिधी**




**राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या दर्शनाने नविन ऊर्जा व शक्ती प्राप्त होऊन अन्यायाविरोधात लढण्यासाठी प्रचंड प्रेरणा मिळते. आज राज्यात धर्माच्या नावावर जातीय द्वेष पेरला जातोय. मात्र, अध्यात्माच्या माध्यमातून सामाजिक समता, शांतता व प्रेमाच्या सद्भावनेची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन आमदार रोहित पवार यांनी केले.**

श्री क्षेत्र भगवानगड येथील राष्ट्रसंत श्री भगवान बाबा यांच्या समाधीच्या दर्शनानंतर आमदार पवार बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अ‍ॅड. प्रताप ढाकणे, तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, माजी नगरसेवक बंडू पाटील बोरूडे, सिताराम बोरूडे, महारूद्र किर्तने, किरण खेडकर, राजेंद्र जगताप, योगेश रासने, राजेंद्र हिंगे, विष्णू थोरात, गणेश सुपेकर, रामराव चव्हाण, राजू ढाकणे, श्रीराम फुंदे आदी उपस्थित होते.

आमदार पवार म्हणाले की,संत भगवानबाबांनी दऱ्याखोऱ्यातील वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाज प्रबोधनाचे मोठे काम केले. शिक्षणाचे महत्व जुन्या काळात जनतेच्या लक्षात आणून दिल्याने या भागातीलच नाही तर महाराष्ट्रातील हाजारो-लाखो जन सुशिक्षीत झाले आहेत. अध्यात्मातून समाज प्रबोधन करत संत भगवानबाबांनी सामाजिक समता व शांतीचा दिलेला संदेश सर्वोच्च असून आज त्यांच्या विचारधारेवर मार्गक्रमण करण्याची नितांत आवश्यकता आहे. यावेळी मठाधिपती न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी पवार यांचे स्वागत केले.

## वाचकांच्या लेखणीतून

### प्रांजळाचे आरसे



गोविंदाग्रज किंवा बाळकराम ऊर्फ राम गणेश गडकरी हे मराठी भाषेचे थोर साहित्यिक. राम गणेश गडकरी नावाने भावबंधन, एकच प्याला आदी नाटके, गोविंदाग्रज नावाने वाग्वैजयंती हा काव्यसंग्रह आणि बाळकराम नावाने अनेक विनोदी लेख लिहिणाऱ्या या लेखक आणि कवीला कोण ओळखीत नाही? गडकऱ्यांचे साहित्य म्हणजे मराठी भाषेचा शृंगार!

गडकरी मास्तर १९१९ मध्ये निवर्तले. मराठीतील थोर साहित्यिक श्रीपाद महादेव माटे यांनी गडकऱ्यांना जवळून पाहिले होते.

माटे मास्तरांनी विचार शलाका नामक पुस्तक लिहिले आहे. त्यात राम गणेशाला माझा मुजरा असा एक सुंदर लेख आढळतो. त्यात माटे मास्तर म्हणतात, गडकरी नुसते सावळे नव्हे तर चांगले काळे होते. रूपाने ते अगदी सुमार होते . वर्ण आणि रूप यांचे देणे सृष्टीने त्यांना दिले नव्हते. मन आणि बुद्धी यांचे एवढे वैभव ज्या माणसाला आपण अर्पण करतो त्याला वर्णाचे आणि रूपाचे वैभव अर्पण करावयास सृष्टीने एवढा कृपणपणा का दाखविला हे ध्यानात येत नाही.....

पुढे त्यांनी म्हटले आहे, गडकरी दिसायला कुरूप. कपाळ अरुंद. डोक्याचे केस भारीच खाली असल्यासारखे वाटत. भुवया काहीशा जाड. डोळे गवळ्या रंगाचे किंवा तांबूस. डोळ्याखालची हाडे काहीशी पुढे आलेली. कानशिले बसलेली. अती धूम्रपानामुळे ओठ काळे दिसत. आपल्या मिशा समोरून कापीत. त्यामुळे चेहरा उग्र दिसे. दातांची निगा नव्हती. देहाची उंची बेताची......

अफाट प्रतिभेचे देणे असलेला सॉक्रेटीस ज्याच्या तत्त्वज्ञानावर त्याचा शिष्य प्लेटो याने रिपब्लिक हा जगप्रसिध्द ग्रंथ सिद्ध केला, तो सॉक्रेटीसही अगदी कुरूप होता! सॉक्रेटीस काय किंवा गडकरी मास्तर काय, जगाचे भले करणाऱ्या, मनाने प्रांजळ असणाऱ्या या विभूतींना विधात्याने रूपसौंदर्यही दिले असते तर काय मोठे नुकसान झाले असते?

कुणीतरी या संदर्भात सुंदर काव्यपंक्ती लिहिल्या आहेत :

देखणे ते चेहरे जे प्रांजळाचे आरसे....
गोरटे वा सावळे या मोल नाही फारसे!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### पिंपरी चिंचवडच्या कुटूंबाला आ. लंकेंच्या माध्यमातून मदत

गंभीर जखमी होते. आ. नीलेश लंके यांना त्याबाबत माहीती देण्यात आल्यानंतर आ. लंके यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे या रूग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्याची शिफारस केली. या शिफारशीवरून दोन रूग्णांना दोन लाख रूपयांची मदत देण्यात आली. याच अपघातात गंभीर जखमी झालेल्या आणखी एका रूग्णावरील उपचारासाठी आणखी मदतीची आवश्यकता असल्याने पुन्हा मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडे शिफारस करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्हयातही गेल्या दोन महिन्यात आ. नीलेश लंके यांच्या शिफारसीवरून मुख्यमंत्री सहायता निधीचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी १४ लाख रूपयांची मदत दिल्याचे कोल्हापुर येथील साईनाथ फाउंडेशन सेवाभावी संस्थेचे राकेश पाटील यांनी सांगितले. मुख्यमंत्री सहाय्यता निधीबरोबरच सिध्दीविनायक ट्रस्ट तसेच इतर सेवाभावी संस्थांकडूनही आ. लंके यांच्या शिफारसीवरून मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

### घोडनदीपात्रात सापडलेल्या मृतदेहाचे गूढ उलगडले

ता. शिरूर कासार, जि. बीड यांना अटक केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप यादव हे करीत असून तीन ही आरोपींना न्यायालयाने दि. १० फेब्रुवारी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली आहे . हा तपास पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत गवारी, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक जोतिराम गुंजवटे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप यादव, पीएसआय एकनाथ पाटील, पोलीस हवालदार अरूण उबाळे, परशराम सांगळे, पोलीस नाईक नाथसाहेब जगताप, पोलीस अंमलदार रघुनाथ हाळनोर, नितेश थोरात, विकी यादव, संतोष साळुंखे तसेच स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांचेकडील पोलीस उपनिरीक्षक गणेश जगदाळे, सहाय्यक फौजदार तुषार पंधारे, पोलीस हवालदार जनार्दन शेळके, यांनी केला .

### मनोज जरांगेंचा चार जिल्ह्यांचा दौरा

मोर्चा दाखल झालेला असताना सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांना अधिसूचनेचा मसुदा सुपुर्द केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनोज जरांगे यांनी आपले उपोषण वाशीतच सोडले होते.

जरांगेंची मुंबईत समाजाच्या लोकांशी बैठक देखील होणार आहे. ८ फेब्रुवारी आणि ९ फेब्रुवारीला नाशिक आणि बीडमधील कार्यक्रम आटोपून ते जालन्यातील अंतरवाली सराटीत दाखल होतील.

मात्र, अंतरवाली सराटीतून निघताना मनोज जरांगे यांची भूमिका सरसकट आरक्षणाची असताना सगेसोयरेच्या मुद्यावर मोर्चा थांबवण्यात आला, अशा प्रकारची मतं सोशल मीडियावर अनेकांनी व्यक्त केली होती. मनोज जरांगे यांनी सोशल मीडियावरुन आक्षेप नोंदवणाऱ्यांनी अंतरवाली सराटीमध्ये येऊन चर्चा करावी, असं आवाहन केले होते. आता मनोज जरांगे पुन्हा एकदा पुणे, मुंबई, नाशिक आणि बीडचा दौरा करून उपोषणासंदर्भात भूमिका मांडण्याची शक्यता आहे.

### नगर अर्बन बँक घोटाळ्यातील १०५ संशयितांची कथित यादी लिक

८६ कोटी ८५ लाखाची रक्कम काही कर्जदारांनीपरत भरल्याने अपहाराची रक्कम २९१ कोटी २५ लाखाची असल्याचे म्हटले आहे. मुंबईच्या डी. जी. ठकरार अँडअसोसिएटस या फर्मने बँकेच्या कर्जप्रकरणांचे फॉरेन्सिक ऑडीट केले आहे वत्यानुसार १०५ जणांचा गैरव्यवहारात संशयअसल्याचे सांगितले जाते.फॉरेन्सिक ऑडिट आल्यापासून आत्तापर्यंत दोन अधिकारी व तीन संचालक अशा पाच जणांना पोलिसांनी अटक केली. यादी तनावे असलेल्यांपैकी दोघे मयत असून उर्वरीतांचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.पोलिसांनी चौकशीसाठी नोटीसाबजावूनही अनेकांनी प्रतिसाद दिलेलानाही. दुसरीकडे ठेवीदारांनी न्यायालयात तक्रार केल्यावर न्यायालयाने पोलिसांना कानपिचक्या दिल्या व आरोपींना पकडण्यासाठी आवश्यक कारवाईकरण्याचे आदेशही दिले. मात्र, १०५जणांची कथित यादी लिक झाल्याचे समोर येत असून, त्यामुळेच संशयित पसार झाल्याची चर्चा आहे.

कथित यादी लीक झाल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखाअथवा पोलिस प्रशासनाकडून कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. यादी खरी की खोटी, हेही स्पष्टनाही. या संदर्भात तपासी अधिकारी हरिष खेडकर व अपर अधीक्षक प्रशांत खैरे यांना विचारले असता, याबाबत तेही अनभिज्ञ असल्याचे समोर आले.

**बाहेरच्या व्यक्तींशी संपर्कात**

लीक झालेल्या कथित यादी व जबाबावर कोणाचीसही अथवा शिक्का नाही. सुमारे दोन महिन्यापूर्वीचीतारीख व एका पोलिस अधिकाऱ्याचे नाव त्यावरआहे. गेले काही दिवस तीन आरोपी पोलिस कोठडीत,आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यात असताना त्यांचाबाहेरील व्यक्तींशी संपर्क सुरू होता व त्यातूनच हीकथित यादी व्हायरल झाल्याची चर्चा आहे.

# मुंबई- गोवा हायवेवर बर्निंग बसचा थरार

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे गाढ झोपेतील प्रवासी बालंबाल बचावले



**रायगड: प्रतिनिधी**

**मुंबई गोवा महामार्गावर चालत्या लक्झरी बसने अचानक पेट घेतला पण सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. सगळे प्रवासी गाढ झोपेत असताना चालत्या बसने पेट घेतला मात्र हा सगळा प्रकार चालकाच्या लक्षात आल्याने बसमधील एकूण २२ प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आहे.**

मंगळवारी मध्यरात्री दोन वाजताच्या दरम्यान मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजेवाडी फाट्याजवळ औदुंबर ट्रॅव्हल्सची लक्झरी बस जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. औदुंबर ट्रॅव्हल्सचा (क्र.एम.एच.०८,९७७९) क्रमांकाची लक्झरी बस रत्नागिरीवरुन मुंबई येथे निघाली होती. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील राजेवाडी फाट्याजवळ आली असता बसचा टायर गरम होऊन फुटल्याने लक्झरी बसने पेट घेतला. आग लागल्याचे चालक गुलशन पठाण याच्या लक्षात येताच लक्झरी बस रस्त्याच्या साईडला घेऊन सर्व प्रवाशांना बस मधून खाली उतरवण्यात आले. यावेळी बस मध्ये दोन चालकांसह २२ प्रवाशी प्रवास करीत होते.

चालकाच्या प्रसंगावधानामुळे लक्झरी बसमधील सर्व प्रवासी बचावले आहेत. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचेपर्यंत भीषण आगीत लक्झरी बस पुर्णतः जळून खाक झाली. या संपूर्ण घटनेचा अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राठोड करीत आहेत.

# पारनेर पब्लिकमधील जलकुंभाचे पुर्ननिर्माण

## शिंगवी परिवाराचे दातृत्व



■ प्रकाश शिंगवी व त्यांच्या परिवाराकडून पारनेर पब्लिक स्कुलमधील जलकुंभाचे पुर्ननिर्माण करण्यात आले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या शिक्षण संकुलातील स्व. पोपटलाल हंसराज शिंगवी यांच्या स्मृती प्रित्यर्थ सन २००६ साली बांधण्यात आलेल्या जलकुंभजलाचे मंगळवारी पुर्ननिर्माण करण्यात आले. शिंगवी परिवाराने त्यासाठी योगदान दिले.**

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना उद्योजक प्रकाश शिंगवी यांनी सांगितले की, सामाजिक कार्य व समाज हिताची कामे करण्याची प्रेरणा मला माझे वडील कै. पोपटलाल शिंगवी यांच्या कार्यातून मिळाली आहे. आज या जलकुंभाचे पुर्ननिर्माण व नुतनीकरण करताना मला खूप आनंद होत आहे. वडीलांच्या प्रेरणेतून शाळेतील भौतिक सुविधांचा विकास करण्यासाठी ५० हजार रूपयांची देणगी देण्याची घोषणाही शिंगवी यांनी यावेळी केली.

यावेळी शिंगवी यांनी पारनेर पब्लिक स्कुलच्या शैक्षणिक दर्जाचे कौतुक केले. प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी लावलेल्या या रोपट्याचा वटवृक्ष झाला असून या शिक्षण संकुलाने जिल्हयामध्ये आपले वेगळेपण निर्माण केले आहे. परीक्षा कोणतीही असो त्या परीक्षेवर पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी छाप पाडली नाही असे एकदाही झाले नाही. यावरून या शिक्षण संकुलाचा शैक्षणिक दर्जा अधोरेखीत होत असल्याचे शिंगवी यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रकाश शिंगवी यांच्यासह रूपाली शिंगवी, दर्शना शिंगवी, दिया शिंगवी हे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, संस्थापक तथा शिक्षण संकुलाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, दीपक जाधव, राहुल ठुबे, योगेश पिसे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### इतरांसाठी प्रेरणादायी

**सामाजिक जाणीवेतून प्रकाश शिंगवी व त्यांच्या परिवाराने जलकुंभाच्या पुर्ननिर्माणासाठी दिलेले योगदान कौतुकास्पद आहे. वडीलांची सामाजिक बांधिलकीची परंपरा प्रकाश शिंगवी हे पुढे नेत असून अनेक सामाजिक कार्यात त्यांनी दिलेले योगदान इतरांसाठी प्रेरणादायी आहे.**

**गिताराम म्हस्के, प्राचार्य**

# धोत्रे सोसायटीच्या चेअरमनपदी रभाजी भांड

## दिपक भागवत व्हा. चेअरमन

**धोत्रे बुद्रुक : प्रतिनिधी**

**धोत्रे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रभाजी भांड गुरूजी तर व्हाईस चेअरमनपदी दिपक भागवत यांची बिनविरोध निवड झाली.**



■ धोत्रे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर गुलालाची उधळण करीत आनंद व्यक्त करण्यात आला.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक गणेश औटी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चेअरमनपदासाठी रभाजी भांड यांच्या नावाची सुचना हारकू भिटे यांनी मांडली, त्यास भास्कर कुटे यांनी अनुमोदन दिले. व्हाईस चेअरमनपदासाठी दिपक भागवत यांच्या नावाची सुचना रविंद्र भांड यांनी मांडली त्यास सदानंद रोकडे यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी औटी यांनी जाहिर केले. निवडीनंतर गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

काही दिवसांपूर्वी मतभेद विसरून संचालकांनी एकत्र येत पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांवर अविश्वास दाखल करून तो मंजुर करण्यात आला. त्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक बोलविण्यात आली होती. बिनविरोध निवडीसाठी सुभाष सासवडे, राजू रोडे, एम डी भांड, बाबासाहेब सासवडे, नंदकुमार भांड, बाळासाहेब नाईकवाडी यांनी प्रमुख भूमिका बजावली. सावळेराम भांड, रामदास भांड, हारकूशेठ भिटे, बाळू भागवत, त्रिंबक भांड, कुंडलीक भांड, विनोद रोकडे, सुधिर भांड, शरद गवते, विनायक भांड यांनी बिनविरोध निवडीसाठी परिश्रम घेतले. सचिव आर के भांड, सयाजी खटके यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

धोत्रे गावाच्या वैभवात भर घालणारी वास्तू उभी रहावी यासाठी पक्षीय मतभेद दुर सारून आ. नीलेश लंके यांचे समर्थक रभाजी भांड यांची चेअरमनपदासाठी तर व्हाईस चेअरमनपदासाठी दिपक भागवत यांची निवड करण्यात आली.

### सहकार वैभव

**सोसायटी स्थापनेपासून प्रथमच प्राथमिक शिक्षकास चेअरमनपदाची संधी दिल्याबददल सर्व संचालक व पदाधिकाऱ्यांचे आभार. पदाला योग्य न्याय देताना शंभर टक्के वसुली करून पारदर्शी कारभार करण्यावर भर देण्यात येईल. आ. लंके यांच्या माध्यमातून गावाच्या वैभवात भर घालणारी सहकार वैभव ही इमारत उभारण्यात येईल.**

**रभाजी भांड**
**चेअरमन, धोत्रे विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटी**

# शिवरायांच्या जयंतीची निघोजमध्ये जय्यत तयारी

## मळगंगा मंदिरात बैठक संपन्न



■ मळगंगा मंदिरात पार पडलेल्या बैठकीत १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या करण्यात येणाऱ्या शिवजयंतीचे नियोजन करण्यात आले.

**निघोज : प्रतिनिधी**

**येत्या १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या करण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीची निघोजमध्ये जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर मळगंगा मंदिरात शिवबा संघटना, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशन, ग्रुप ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांची एकत्रीत बैठक पार पडली.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव मोठया प्रमाणावर साजरा करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज दरबाराची प्रतिकृती मिरणूकीत असावी,जेणेकरून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आजच्या युवा पिढीच्या नसानसात भिनले पाहिजे असा निर्णय यावेळी घेण्यात आला. बैठकीस संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ पाटील, शिवबा संघटनेचे संस्थापक अनिल शेटे, तालुकाध्यक्ष बबनराव तनपुरे, मुख्य पदाधिकारी राजू लाळगे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे, युवा नेते रवि लंके, मच्छिंद्र लाळगे, राहुल शेटे, अविनाश लामखडे, मिनीनाथ कवाद, लहू निचित, विशाल लामखडे, शैलेश लामखडे, ठकाराम गायखे, श्रीकांत लामखडे, आपला गाव गणपती समाजसेवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष रवि रणसिंग यांच्यासह युवक मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते. यावेळी दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता शिवज्योतीचे भव्य स्वागत, महाआरती, संध्याकाळी मिरवणूक तसेच व्याख्यान आदी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

# अनिकेत शेळके जिल्हा खरेदी विक्री संघाचे संचालक

## बिनविरोध निवड

**सुपा : प्रतिनिधी**

**नगर जिल्हा खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी श्रीगोंदे मतदारसंघातून एरंडोली येथील अनिकेत रविंद्र शेळके यांची बिनविरोध निवड झाली. कैलास पाचपुते, दत्ता पानसरे यांनी आपले अर्ज मागे घेतल्याने शेळके यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.**



जिल्हा संघाच्या पंचवार्षीक निवडणूकीसाठी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नाटमय घडामोडी होऊन श्रीगोंदा तालुक्यातून अनिकेत शेळके यांना संधी मिळाली. महिला मतदारसंघातून मावळते संचालक दादासाहेब साबळे यांच्या पत्नी ज्योती साबळे यांना बिनविरोध संधी देण्यात आली.

कमी वयात संचालक होण्याची संधी शेळके यांना मिळाली. खा. डॉ. सुजय विखे, जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजी कर्डीले, आ. बबनराव पाचपुते, राजेंद्र नागवडे, दत्ता पानसरे, बाबासाहेब भोस, भगवान पाचपुते, प्रताप पाचपुते, आदेश नागवडे, वैभव पाचपुते, सचिन कातोरे, श्रीकांत मगर, बाळासाहेब मोहारे यांचे बिनविरोध निवडीसाठी सहकार्य लाभले. महाराष्ट्र राज्य बाजार समिती महासंघाचे सभापती बाळासाहेब नाहटा जिल्हा बँकेचे मा. संचालक दत्ता पानसरे, खरेदी विक्री संघाचे संचालक आदेश नागवडे यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी परीश्रम घेतले.

# प्रा. स्वाती फापाळे-काटे नेट परिक्षा उत्तीर्ण

## मान्यवरांकडून अभिनंदन

**अळकुटी : प्रतिनिधी**

**अळकुटी येथील डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक प्रा. स्वाती फापाळे-काटे या नुकत्याच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राध्यापक पात्रता अर्थात नेट परिक्षा उत्तीर्ण झाल्या.**



■ स्वाती फापाळे-काटे नेट परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा अळकुटी महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

मराठी या आपल्या मातृभाषेत फापाळे-काटे यांनी आपले पदव्युततर शिक्षण पुर्ण करीत गेली दहा वर्षे त्या आळकुटी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्र, परिषदा व कार्यशाळांमये सहभाग नोंदवून अनेक मुलभुत विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केले आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव करीत नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा फोरम या संस्थेने त्यांना डॉ. सर्वपल्ली राधकृष्णन आदर्श गुरूजन पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांचे सावित्रीबाई फुले पुण विद्यापीठांतार्गत संत बहिणाबाई आणि संत निळोबाराय यांचया अभंगांचा काल खंडात्मक अभ्यास या विषयावर पिएचडीचे संशोधन कार्यही सुरू आहे.

स्वाती फापाळे-काटे यांनी मिळविलेल्या यशाबद्दल प्रवरा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास मंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे सचिव भारत घोगरे पाटील, संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, संस्थेचे सर्व पदाधिकारी,अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे व सर्व सहकारी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले. त्यांचया या यशाचे सर्व थरांतून कौतुक होत आहे.

# व्यवहारेंचा गैरव्यवहार सभासदांनी ओळखला

## दत्तात्रय भुजबळ यांचा आरोप

**सुपा : प्रतिनिधी**

**सैनिक बँक निवडणुकीत बँक सभासदांनी बँकेत केलेला व्यवहारेंचा गैरव्यवहार ओळखला असून त्यांच्या कोणत्याही थापांना मतदार भूलणार नसल्याचे प्रतिपादन परिवर्तन पॅनलचे उमेदवार दत्तात्रय भुजबळ यांनी केले.**



■ बाबुर्डी ता. पारनेर येथे परिवर्तन पॅनलच्या प्रचार प्रसंगी सैनिक बँक माजी चेअरमन सुभाष ठुबे,माजी संचालक किसन(नाना) ठुबे,बाबासाहेब गवळी, रमेश दिवटे,रामदास गवळी,ताराचंद करंजुले इत्यादी. (छाया - शरद रसाळ, सुपा)

पारनेर तालुक्यातील बाबुर्डी येथे झालेल्या प्रचारदरम्यान बोलताना दत्तात्रय भुजबळ म्हणाले की, व्यवहारे यांनी मागील निवडणुकीत जो वचननामा दिला होता त्या वचननाम्यातील एकतरी मुद्दा पाळला का? बँकेत भ्रष्ट कारभार केल्याने ५ गुन्हे दाखल झाले.संजय गांधी निराधार योजनेत गरिबांचे पैसे खाणाऱ्याला पाठीशी घातले. ते प्रकरण थांबते नाही तोच त्याच कर्जत शाखेत १ कोटी ७९ लाख रुपयांचा चेक घोटाळा झाला. याला जबाबदार चेअरमन शिवाजी व्यवहारे असल्याची टीका भुजबळ यांनी केली.

या वेळी सैनिक बँक माजी चेअरमन सुभाष ठुबे, विक्रमसिंह कळमकर, माजी व्हा चेअरमन किसन(नाना) ठुबे, माजी व्हा चेअरमन बाबासाहेब गवळी, बँकेचे सभासद रामदास गवळी, संतोष दिवटे, रमेश दिवटे, बापू दिवटे, राजू गाडगे, प्रकाश पिसे, सुरेश काकडे, भाऊसाहेब गवळी, बाबू गवळी, वामन बारवकर,भरत दिवटे, बाळासाहेब दिवटे, बाळासाहेब गारकर, अमृत कदम,सखाराम बारवकर, ज्ञानदेव दिवटे, प्रकाश दिवटे, सचिन वाबळे, सुभाष वाबळे, किरण नगरे, उमेश नगरे, भाऊसाहेब देंडगे, ताराचंद करंजुले यांच्या सह आजी माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुशिला साहेबराव गवळी यांचे निधन

**सुपा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील अपधूप येथील सौ. सुशिला साहेबराव गवळी यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.**



अपधूप गावचे माजी सरपंच तथा खंडेश्वर देवस्थानचे अध्यक्ष किसन गवळी श्री मंगलमुर्ती सार्वजनीक वाचनालयाचे अध्यक्ष आदर्श शिक्षक भाउसाहेब गवळी यांच्या त्या मातोश्री होत. सौ. सुशिलाबाई अत्यंत मनमिळावू प्रेमख स्वभावाच्या होत्या. अपधूप गावातील ज्येष्ठ मातेचे निधन झाल्याने गावासह परिसरावर शोककळा पसरली आहे. सौ. सुशिला यांच्यावर अपधूप येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# संसाराचा गाडा ओढता ओढता जडला बैलगाडयाचा छंद!
# बैलगाडाप्रेमी मच्छिंद्रशेठ यांचे वृद्धापकाळाने निधन





चोंभूत येथील जुन्या पिढीतील व्यक्तीमत्व मच्छिंद्रशेठ बाबुराव म्हस्के यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी वृध्दापकाळाने जगाचा निरोप घेतला. एकत्र कुटूंब पध्दतीसाठी आग्रही असलेल्या स्व. मच्छिंद्रशेठ यांच्या निधनाने परिसर हळहळला.

आपल्या परिवाराच्या संसाराचा गाडा हाकताना सामाजिक बांधिलकी जपत स्व. मच्छिंद्रशेठ यांनी समाजकार्यात आपल्या परीने नेहमीच योगदान दिले. बैलगाडा शर्यतीवर त्यांचे नितांत प्रेम. गेल्या चाळीस वर्षात स्व. मच्छिंद्रशेठ यांनी विविध शर्यतींना हजेरी लावत या शर्यतींचा आनंद लुटला. बैलगाडा शर्यतींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी मदतीचा हातही दिला. म्हस्के हे पारनेर तालुक्यातील रहिवासी असले तरी शेजारच्या पुणे जिल्हयातील जांबुतशी त्यांचा व्यवसायाच्या माध्यमातून मोठा जनसंपर्क होता. जनसामान्यांच्या सुख दुःखात मिळून मिसळून राहणारे हे व्यक्तीमत्व सर्वांसाठी मार्गदर्शकाच्या भुमिकेतून काम करीत असे.

**संकलन**
**स्वप्नील भालेराव**

### व्यवसाय, राजकारण, सहकारात प्रभाव

स्व. मच्छिंद्रशेठ यांनी जांबुत ता. शिरूर येथे व्यवसायाच्या निम्मिताने त्यांच्या पुतण्यांना व्यवसायाचे बाळकडू दिले. आज रोजी जांबुत येथे पुतणे माजी उपसरपंच दत्तात्रय म्हस्के, किरण म्हस्के, अभिजित म्हस्के हे कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून कार्यरत आहेत. तसेच अळकुटी येथे चोंभेश्वर ग्रामीण पतसंस्थेच्या माध्यमातून खंडू म्हस्के हे सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत. चोंभूतच्या लोकनियुक्त सरपंच कांचन म्हस्के ह्या त्यांच्या सून होत.

### सामाजिक भान जपणारं व्यक्तीमत्व

समाजाशी नाळ जोडलेले स्व. मच्छिंद्रशेठ म्हस्के हे सामाजिक भान जपणारे व्यक्तीमत्व होते. आमच्यासाठी नेहमीच मार्गदर्शकाची भूमिका बजावणाऱ्या मच्छिंद्रशेठ यांचे निधन झाल्याने आम्ही मार्गदर्शकाला मुकलो आहोत.

**सचिन वराळ पाटील**
अध्यक्ष, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशन

### सामाजिक सलोखा जपणारे व्यक्तीमत्व

समाजामध्ये सामाजिक सलोखा जपणारे स्व. मच्छिंद्रशेठ यांनी हयातभर परस्परांमधील बंधुभाव जपण्याचे काम केले. अळकुटी परीसर असो व शिरूर तालुक्यातील जांबूत परिसर असो सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याची त्यांची भूमिका असे.

डॉ. भास्कर शिरोळे

### म्हस्के घराण्याचे वैभव हरपले

चोंभूत येथील म्हस्के घराण्याचे वैभव स्व. मच्छिंद्रशेठ यांच्या निधनान हरपले आहे. जुन्या पिढीतील स्व. मच्छिंद्रशेठ हे परिसरातील नागरीकांसाठी मार्गदर्शक होते. आमच्यासारख्या राजकारण्यांनाही स्व. मच्छिंद्रशेठ मोलाचा सल्ला देत. एकत्र कुटूंब पध्दतीचा पुरस्कार करीत स्व. मच्छिंद्रशेठ यांनी अळकुटी परिसरात आदर्श निर्माण केला.

**आ. नीलेश लंके**

### बैलगाडाप्रेमी मच्छिंद्रशेठ

स्व. मच्छिंद्रशेठ यांचे बैलगाडा शर्यतीवर आपार श्रध्दा होती. बैलगाडा शर्यती सुरू राहिल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचा हा छंद आहे. परीसरातील बैलगाडा शर्यती स्व. मच्छिंद्रशेठ यांनी कधीही चुकविल्या नाहीत. बैलगाडा शर्यती जपणारे व्यक्तीमत्व हरपले.

**मधुकर उचाळे**, मा. सभापती

### बेट भागाशी नाळ

स्व. मच्छिंद्रशेठ हे पारनेर तालुक्यातील असले तर त्यांची नाळ शिरूर तालुक्यातील बेट भागाशी जोडलेली होती. या भागात त्यांचा दांडगा जनसंपर्क होता. सर्वांशी प्रेमाने बोलणा-या मच्छिंद्रशेठ यांचा मोठा मित्र परीवार या भागात होता. त्यांच्या निधनाने बेट भाग आजातशत्रू व्यक्तीमत्वास मुकला आहे.

**पोपटराव गावडे**
माजी आमदार

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com